**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रशिद मौला सैय्यद — अपीलकर्ता
स.नं.९५, वानवडी बाजार, चर्च समोर,
वानवडी, पुणे-४०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३४ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रशिद मौला सैय्यद
स.नं.९५, वानवडी बाजार, चर्च समोर,
वानवडी, पुणे-४०

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे-१ तर्फे प्रतिनिधी
श्री. सलीम म. हुंडेकर

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे-१ तर्फे प्रतिनिधी
श्री. सलीम म. हुंडेकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.९.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अनुकंपा वारसामधील प्रतिक्षा यादीत समावेश असूनही आपल्याला सेवेत घेतले नाही. निर्धारित वय उलटलेल्या किंवा फौजदारी दावा दाखल असलेल्या व्यक्तींनाही कामावर घेण्यात आले आहे.या संदर्भातील माहिती व नोकरी न देऊन आपल्यावर अन्याय केला जात आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. रशीद मौला सय्यद यांनी केले.

अपीलकर्त्यास सर्व माहिती वेळोवेळी देण्यात आली आहे. अनेक बाबींविषयीचे स्पष्टीकरण / खुलासा त्यांनी मागितला असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ही 'माहिती' ठरत नाही. तसेच नोकरी मिळण्याच्या मागणीचाही या अधिनियमात समावेश होत नाही. म्हणून त्याचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे-१ यांनी दिले नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे-१ यांचे प्रतिनिधी श्री. सलीम म. हुंडेकर यांनी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 27 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सोपान लक्ष्मण मानकर
मु.ठाकुरसाई, पो.पवनानगर, ता.मावळ,जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मावळ,
तहसील कार्यालय, मावळ, ता.मावळ, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ,
तहसील कार्यालय, मावळ, ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सोपान लक्ष्मण मानकर
मु.ठाकुरसाई, पो.पवनानगर, ता.मावळ,जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ,
तहसील कार्यालय, मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.राजेश चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.:.१००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | निर्णय दिला नाही |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.२.२०१० रोजी घेण्यात आली.

पन्नास वर्षे आपण कसत असलेल्या जमिनीच्या क,ड,इ पत्रकांच्या नकला व सन २००६-०७ सालचा ७/१२ उतारा मागणी करूनही जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ, तहसील कार्यालय, मावळ, ता.मावळ, जि.पुणे यांच्याकडून मिळाला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सोपान लक्ष्मण मानकर यांनी केली.

आपण जमीन कसत असल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे असले तरी वनविभागाचे सर्वे नंबर, क, ड, इ पत्रक कोठेही उपलब्ध नाही. तसे उत्तर अपीलकर्त्यास विहित मुदतीत दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ, तहसील कार्यालय, मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.राजेश चव्हाण यांनी नमूद केले.

वनविभागाची नोंद असलेली कागदपत्रे व नमुना नं.१, नमुना नं.१ ईच्या छायांकित प्रती अपीलकर्त्यास पुरविण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संबंधित जमिनीच्या खात्याचे सन १९५५ पासूनचे अधिकार अभिलेख उपलब्ध असून त्याच्या नकला, वनखात्याची नोंद करणाऱ्या फेरफाराची प्रत, तसेच गावकामगार तलाठी, ठाकूरसाई यांच्याकडून नमुना नं.१ अ व १ ईच्या छायांकित प्रती उपलब्ध करून घेऊन अपीलकर्त्यास देण्यात आल्याचे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१६.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.;.१००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | निर्णय दिला नाही |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.२.२०१० रोजी घेण्यात आली.

पन्नास वर्षे आपण कसत असलेल्या जमिनीच्या क,ड,इ पत्रकांच्या नकला व सन २००६-०७ सालचा ७/१२ उतारा मागणी करूनही जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ, तहसील कार्यालय, मावळ, ता.मावळ, जि.पुणे यांच्याकडून मिळाला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सोपान लक्ष्मण मानकर यांनी केली.

आपण जमीन कसत असल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे असले तरी वनविभागाचे सर्वे नंबर, क, ड, इ पत्रक कोठेही उपलब्ध नाही. तसे उत्तर अपीलकर्त्यास विहित मुदतीत दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ, तहसील कार्यालय, मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.राजेश चव्हाण यांनी नमूद केले.

वनविभागाची नोंद असलेली कागदपत्रे व नमुना नं.१, नमुना नं.१ ईच्या छायांकित प्रती अपीलकर्त्यास पुरविण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संबंधित जमिनीच्या खात्याचे सन १९५५ पासूनचे अधिकार अभिलेख उपलब्ध असून त्याच्या नकला, वनखात्याची नोंद करणाऱ्या फेरफाराची प्रत, तसेच गावकामगार तलाठी, ठाकूरसाई यांच्याकडून नमुना नं.१ अ व १ ईच्या छायांकित प्रती उपलब्ध करून घेऊन अपीलकर्त्यास देण्यात आल्याचे

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ, तहसील कार्यालय, मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.राजेश चव्हाण यानी दि.२३.२.२०१० च्या पत्रान्वये संबंधित प्रतींसह आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२६.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गणेश पानसरे
१४७, शनिवार पेठ, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, श्रीगोंदा तहसील कार्यालय,
ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
श्रीगोंदा तहसील कार्यालय, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५४९ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गणेश पानसरे
१४७, शनिवार पेठ, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
श्रीगोंदा तहसील कार्यालय, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर प्रतिनिधी श्री.जे.बी.भैसडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२६.५.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.६.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२७.७.२००९ |
| ६ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कमाल जमीन धारणा कायद्या अंतर्गत पारित केलेल्या जमिनीसाठी आपल्या कुटुंबियांना नुकसानभरपाई देण्यात आली की नाही, या अनुषंगाने आपण मागितलेल्या माहितीपोटी रजिस्टरमधील नोंदीच्या छायांकित प्रती देण्यात आल्या. परंतु त्या साक्षांकित केलेल्या नाहीत. तसेच नुकसानभरपाई दिली गेली की नाही हे त्यातून स्पष्ट होत नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.गणेश पानसरे यांनी केली.

अपीलकर्त्यांनी मूळ अर्जात संबंधित जमिनीचा गट क्रमांक, संपादनाचे वर्ष आदी कोणताही तपशील दिलेला नाही. सन १९७५ पूर्वीचा हा विषय असल्याचे त्यांच्याशी झालेल्या चर्चेत स्पष्ट झाले. मूळ अर्जानुसार शोध घेऊन अभिलेखात उपलब्ध असलेल्या माहितीच्या प्रती दिल्या. संबंधित जमिनीबाबत नुकसानभरपाई रोखा विभागीय आयुक्तांकडे पाठविल्याचा उल्लेख त्यात आहे. प्रती साक्षांकित करून देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला, परंतु त्यासाठी अपीलकर्त्यांनी नंतर संपर्क साधला नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांचे प्रतिनिधी श्री.जे.बी.भैसडे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्याचा अर्ज नेमकेपणाने माहितीची मागणी करणारा नाही. तरीही उपलब्ध माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. नुकसानभरपाई देण्यात आली नसल्यास का दिली नाही या स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि संबंधित विषयात तहसीलदारांकडे अथवा अन्य पातळीवर अपील केले असल्यास त्याबाबतचा तपशील अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी द्यावा व त्या आधारे संबंधित विषयातील नुकसानभरपाईविषयक कार्यवाहीची माहिती प्राप्त करून घेऊन जन माहिती अधिकारी

तथा निवासी नायब तहसीलदार, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांनी १५ दिवसात अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, श्रीगोंदा, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांनी दि.२५.५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण
संपादक झेप यांचे कार्यालय, अब्दुलहमीद शॉपिंग सेंटर,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी,
कृषी विभाग यांचे कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी अधिकारी,
कृषी विभाग यांचे कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५१ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण
संपादक झेप यांचे कार्यालय, अब्दुलहमीद शॉपिंग सेंटर,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग यांचे कार्यालय,
ता.इंदापूर, जि.पुणे श्री.पी.डी.सिगेदार

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा कृषी अधिकारी,<br>कृषी विभाग यांचे कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.एन.एस.भोसले | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२२.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२४.८.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

विहित मुदतीत माहिती मिळाली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, ता.इंदापूर, जि.पुणे यांनी अपिलाची सुनावणी घेतली नाही, वारंवार प्रयत्न केल्यानंतरही सर्वच मुद्दयांची अपुरी माहिती मिळाली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण यांनी केले.

अपीलकर्ता श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण यांनी अनेक मुद्दयांची व अत्यंत व्यापक स्वरूपाची माहिती मागितली होती. त्याच दरम्यान खात्याची पुनर्रचना झाली होती व बऱ्याच कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या होत्या. त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.एन.एस.भोसले यांनी केले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या तारखेच्या वेळी अचानक दौऱ्यावर जावे लागल्यामुळे सुनावणी घेता आली नाही व त्यानंतर अपीलकर्त्यांनी आयोगाकडे अपील केले असल्यामुळे सुनावणीस हजर राहणार नसल्याचे सांगितल्यामुळे अपिलाचा निर्णय दिला नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.पी.डी.सिगेदार यांनी नमूद केले.

अपीलकर्त्यांनी अत्यंत विस्तृत स्वरूपात माहिती मागितली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिपादन रास्त आहे. तथापि अशा संदर्भात अभिलेखाचे अवलोकन अपीलकर्त्यास विहित मुदतीत करू देण्याचा मार्ग जन माहिती अधिकारी यांनी

अनुसरणे आवश्यक आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी विहित मुदतीत अपिलाचा निर्णय देणे बंधनकारक आहे, याची समज अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.पी.डी.सिगेदार यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास मूळ अर्जानुसार संबंधित संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करून द्याव्यात व त्यातील त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांची यादी त्यांनी लेखी स्वरूपात सादर केल्यानंतर प्रती निःशुल्क व त्वरित द्याव्या.

पुणे
30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.आर.आर.नरंगलकर (अपील क्र.१५५५)
ए-५/१४, गंगा रेसीडेन्सी, भाजी मंडईजवळ, हडपसर, पुणे
(२)श्री.एस.एस.काटे (अपील क्र.१५८३)
(३)श्री.जे.जे.घोडके
बालामल चाळ, बी/१४, पिंपरी गाव, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५५+१५८३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.आर.आर.नरंगलकर (अपील क्र.१५५५)
ए-५/१४, गंगा रेसीडेन्सी, भाजी मंडईजवळ, हडपसर, पुणे
(२)श्री.एस.एस.काटे (अपील क्र.१५८३)
(३)श्री.जे.जे.घोडके
बालामल चाळ, बी/१४, पिंपरी गाव, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे प्रतिनिधी श्री.बी.डी.उढाणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.आर.आर.नरंगलकर (अपील क्र.१५५५)
ए-५/१४, गंगा रेसीडेन्सी, भाजी मंडईजवळ, हडपसर, पुणे
(२)श्री.एस.एस.काटे (अपील क्र.१५८३)
(३)श्री.जे.जे.घोडके
बालामल चाळ, बी/१४, पिंपरी गाव, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५५+१५८३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.आर.आर.नरंगलकर (अपील क्र.१५५५)
ए-५/१४, गंगा रेसीडेन्सी, भाजी मंडईजवळ, हडपसर, पुणे
(२)श्री.एस.एस.काटे (अपील क्र.१५८३)
(३)श्री.जे.जे.घोडके
बालामल चाळ, बी/१४, पिंपरी गाव, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे प्रतिनिधी श्री.बी.डी.उढाणे

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव,<br>पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे श्रीमती ए.व्ही.चव्हाण | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.१०.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.११.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०.१२.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी दि.२४.२.२०१० रोजी घेण्यात आली.

अधिव्याख्याता पदासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक पात्रतेच्या अनुषंगाने पुणे विद्यापीठाने सूट दिल्याबाबतची माहिती आपण मागितली होती. परंतु कोणतीही माहिती दिली नाही. अभिलेख अवलोकनासाठी गेल्यानंतर गोदामातील कागदपत्रे शोधण्यास आपल्यालाच सांगितले. अधिव्याख्यात्यांना नेटसेट परीक्षेतून सूट देण्याचे अधिकार नसताना विद्यापीठाने सूट दिली आहे व त्याबाबत दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. अशा व्यक्तींची नावे देऊनही कारवाई केली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.आर.आर.नरंगलकर(अ.क्र.१५५५), श्री.एस.एस.काटे व श्री.जे.जे.घोडके(अ.क्र.१५८३) यांनी केली.

अपीलकर्त्यांनी मागितलेल्या स्वरूपाची माहिती संकलित स्वरूपात विद्यापीठाकडे नसते. तीन अधिव्याख्यात्यांच्या संदर्भात विद्यापीठाकडे असलेली माहिती दिली. ढोबळ मानाने व व्यापक स्वरूपाची माहिती विचारलेली असल्यामुळे अभिलेख अवलोकनासाठी त्यांना कळविले. तथापि न येता त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, रोड, पुणे यांच्याकडे अपील केले. संबंधित विषयातील सर्व कागदपत्रांची तपासणी अपीलकर्त्यांनी करावी, असा निर्णय

तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, रोड, पुणे यांनी दिला. कागदपत्रे तपासणी करू देण्याबाबत कळविले, परंतु ते आले नाहीत. विद्यापीठाच्या कक्षेत एकूण ५४७ महाविद्यालये असल्यामुळे एवढ्या महाविद्यालयांची सन १९९१ पासूनची माहिती संकलित करून देणे शक्य नाही. विशिष्ट महाविद्यालयांबाबत त्यांनी नेमकेपणाने विचारणा केल्यास माहिती देता येईल, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, रोड, पुणे श्रीमती ए.व्ही.चव्हाण यांनी केले.

कोणतीही माहिती नाकारण्याचा वा लपविण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केलेला नाही. मूळ माहितीबरोबरच अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रतीही अभिलेख अवलोकनानंतर त्यांनी मागणी केल्यास त्यांना देता येतील, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, रोड, पुणे डॉ.एम.एल.जाधव यांचे प्रतिनिधी बी.डी.उढाणे यांनी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. मागितलेल्या माहितीची व्याप्ती पाहता अपीलकर्त्यांनी अभिलेखांचे अवलोकन करून आवश्यक त्या प्रती प्राप्त करून घ्याव्यात. मात्र मूळ अर्जामधील विनंतीच्या अनुषंगाने विशिष्ट महाविद्यालय/अधिव्याख्याता यांच्या संदर्भात नेमकेपणाने माहिती-मागणी अपीलकर्त्याने केल्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी दहा दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. विष्णू रामचंद्र उगले
दिपमळा, मु.पो. दौंड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५५९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २३.२.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. विष्णू रामचंद्र उगले<br>दिपमळा, मु.पो. दौंड, जि. पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे श्री. ए. बी. चव्हाण<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे श्री. एस. आर. काटकर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.१०.२००७, ३.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

दौंड-पाटस व दौंड-कुरकुंभ या दोन रस्त्यांना जोडणाऱ्या रस्त्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर वेळेत मिळाली नाही. नंतर दिलेल्या नकाशात तो

सापडत नाही. सन १९४०-४१ साली केलेला रस्ता दाखविला असून सन १९७४ मध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याने रस्ता केला. जमीन संपादित केलेली नाही. आता रस्ता राज्य राखीव पोलीस दलाने अडविला आहे. लगतच्या आपल्या इमारतीला पाडण्याबाबत नोटीस सार्वजनिक बांधकाम खात्याने दिली आहे. माहिती दिली जात नाही, नुकसान भरपाईही दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. विष्णू रामचंद्र उगले यांनी केली.

सन १९२२-२३ मध्ये नकाशावर हा रस्ता दिसत नाही. सन १९९०-१९९२ ला लगतच्या रहिवाशांना नोटिसा दिलेल्या आढळतात. याचा अर्थ दरम्यानच्या काळात रस्ता झाला असल्याचे दिसते. ६० वर्षांहून अधिक जुनी माहिती असल्यामुळे शोध घेऊन प्राप्त झालेली सर्व माहिती श्री. उगले यांना दिली. त्यांनी दोन अर्ज दिले असून भूसंपादन झालेले नाही. तसे त्यांना कळविले आहे. रस्ता कोणत्या सर्व्हे क्रमांकातून जातो याची माहिती देण्याबाबत तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांना कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री. एस. आर. काटकर व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री. ए. बी. चव्हाण यांनी केले.

संबंधित रस्त्याचा नकाशा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन जन माहिती अधिकारी श्री. एस. आर. काटकरयांनी अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार नकाशा प्राप्त करुन घेऊन रस्त्याची लांबी आधोरेखित करुन श्री. उगले यांना पाठविल्याचे दि. २४.२.२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे श्री. एस. आर. काटकर यांनी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.डी.प्रसाद
स्वामी कृपा, चिंचवड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य लेखापाल,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा लेख अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६२ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य लेखापाल,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.एन.एन.लोंढे

**जन माहिती अधिकारी** तथा लेखा अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.मनोहर गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२३.१.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१२.३.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.४.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.६.१०.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.डी.प्रसाद यांचा अर्ज दि.२३.१.२००९ चा असून शुल्क भरल्यानंतर सर्व माहिती दिली. तांत्रिक सल्ला आदी कारणांसाठी झालेल्या खर्चापोटी ४०० रूपये नुकसानभरपाईची मागणी त्यांनी केली होती. प्रथम अपिलाच्या सुनावणीला अपिलीय प्राधिकाऱ्यांपुढे ते उपस्थित नव्हते. टपाल खर्चाची अतिरिक्त रक्कम रुपये १५ परत पाठविण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य लेखापाल, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी दिला. त्यानुसार रक्कम पाठविली, असे जन माहिती अधिकारी तथा लेखा अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी नमूद केले.

४०० रूपये न मिळता केवळ १५ रूपये परत मिळाल्यामुळे श्री.डी.प्रसाद यांनी अपील केल्याचे अर्जात म्हटले आहे. अन्य व्यक्तीच्या आजाराचा व त्यावरील खर्चाचा तपशील श्री.डी.प्रसाद यांनी मागितला आहे, अशा प्रकारची अन्य व्यक्तीची माहिती देता येणार नाही. त्यातील देय माहिती अपीलकर्त्यास दिली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य लेखापाल, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.एन.एन.लोंढे यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी तथा लेखा अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.मनोहर गायकवाड व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य लेखापाल, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे

29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिनेश अनराज ललवाणी
६६८, सदाशिव पेठ, पुणे-३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११ ००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६३ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.४.२०१० |

**३. उपस्थित**
**अपीलकर्ता -** श्री. दिनेश अनराज ललवाणी
६६०, सदाशिव पेठ, पुणे-३०

**जन माहिती अधिकारी** तथा प्रमुख लिपिक,
अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११ ००१
श्रीमती सु. अ. भावसार

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.१०.२००९ |
| ५ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मिळकत पत्रिकेवरील क्षेत्र दुरुस्ती बाबतचा आपला अर्ज गेले एक वर्ष प्रलंबित असून त्याची पूर्तता त्वरित करुन मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. दिनेश अनराज ललवाणी यांनी मूळ अर्जात व सुनावणीतील निवेदनात केली आहे.

श्री. ललवाणी यांच्या अर्जावरील प्रक्रियेबाबतची माहिती त्यांना देण्यात आली आहे. असे क्षेत्र दुरुस्त करुन मिळण्याची विनंती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, पुणे श्रीमती सु.अ.भावसार यांनी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
दि. 27 APR 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास दत्तात्रय बारवकर
चाकण विद्याधाम कॉलनी, चाकण, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, गृह शाखा,
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विलास दत्तात्रय बारवकर
चाकण विद्याधाम कॉलनी, चाकण, ता.खेड, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, गृह शाखा,
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, पुणे श्रीमती सुषमा पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.१०.२००७ |

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास दत्तात्रय बारवकर
चाकण विद्याधाम कॉलनी, चाकण, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, गृह शाखा,
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विलास दत्तात्रय बारवकर
चाकण विद्याधाम कॉलनी, चाकण, ता.खेड, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा नायब तहसीलदार, गृह शाखा,
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, पुणे श्रीमती सुषमा पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.१०.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २.११.१००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१६.२.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

विनापरवाना लकी ड्रॉ संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे लोकशाही दिनात आपण केलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती व चौकशीच्या अहवालाची प्रत आपल्याला अद्याप मिळालेली नाही. अपूर्ण व चुकीची माहिती दिली. आपला अर्ज चौकशीसाठी पोलिसांकडे पाठविला, परंतु जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाचा गैरवापर करून दि.१८.५.१९९९ रोजी विनापरवाना लकी ड्रॉ काढून लोकांना लाखो रूपयांना गंडा घालणाऱ्यांवर कारवाई झालेली नाही. पोलिसांनी आपल्यालाच त्रास दिला. या प्रकरणाची चौकशी होऊन अहवाल मिळावा व संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विलास दत्तात्रय बारवकर यांनी केली.

श्री.बारवकर यांचा माहिती-मागणीचा अर्ज दि.१८.८.२००७ रोजी प्राप्त झाला. दि.१२.९.२००७ रोजी त्यांना शुल्क भरण्याबाबत कळविले. त्याविरुध्द त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, पुणे यांच्याकडे अपील केले. श्री.बारवकर यांचा मूळ तक्रारअर्ज पोलिसांकडे पाठविण्यात आला असून पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण व उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांच्याकडून चौकशी अहवाल प्राप्त झाला नसल्याचेही त्यांना कळविले होते. या संदर्भातील सर्व माहिती त्यांना देण्यात आली असून अद्याप चौकशी अहवाल प्राप्त झाला नसल्यामुळे प्रत देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, गृह शाखा, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, पुणे श्रीमती सुषमा पाटील यांनी केले.

अपीलकर्त्यास मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली आहे. संबंधित प्रकरणी कारवाई करण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र दि.५.३.२००७ रोजी श्री.बारवकर यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे केलेल्या तक्रार अर्जावरील चौकशीचा अहवाल तीन वर्षे उलटून गेल्यानंतरही प्राप्त होत नाही, हे योग्य नाही. संबंधित चौकशीच्या अहवालाबाबतची वस्तुस्थितीची संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याने दि.२५.९.२००६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेल्या तक्रार अर्जावरील चौकशी अहवालाबाबतच्या कार्यवाहीची अद्ययावत माहिती पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण व उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग, खेड यांच्याकडून जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, गृह शाखा, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, पुणे यांनी प्राप्त करून दि.२५.५.२०१० पर्यंत अपीलकर्त्यास द्यावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मनोहर पांडुरंग शेलार
डी-२, ४४/२, आर्मामेंट कॉलनी, गणेशखिंड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय,
शुक्रवार पेठ, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६७ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मनोहर पांडुरंग शेलार
डी-२, ४४/२, आर्मामेंट कॉलनी, गणेशखिंड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय,
शुक्रवार पेठ, पुणे श्री.विजय पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे श्री.जगदीश निंबाळकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१८.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.९.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | आदेश नाही |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

वारस नोंदीप्रमाणे जमिनीला आपल्या नावाची नोंद झाली असून सह-हिस्सेदाराकडून होणाऱ्या अडथळ्याविरुध्द दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला आहे. त्यासाठी, वारस नोंदीबाबत दि.२८.२.२००२ रोजी तहसीलदार, हवेली यांनी दिलेल्या आदेशाकरीता आपण सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती मागणी करूनही जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे यांच्याकडून मिळाल्या नाहीत. अभिलेख संकलनाशी संपर्क साधण्याचे उत्तर त्यानी आपल्याला दिले. परंतु तेथे शोध चालू असल्याचे दर वेळी सांगितले जाते. न्यायालयाने समन्स काढूनही तहसीलदार कार्यालयाचे प्रतिनिधी नयायालयात हजर राहत नाहीत व कागदपत्रेही सादर करीत नाहीत. त्यामुळे दावा प्रलंबित असून आपल्याला त्रास होत आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मनोहर पांडुरंग शेलार यांनी केली.

संबंधित कागदपत्रे तीस वर्षे जतन करण्याच्या वर्गातील आहेत. तथापि अभिलेखात त्यांचा आढळ होत नाही. संबधित कर्मचाऱ्यांना याबाबत नोटिसा काढण्यात आल्या होत्या. कागदपत्रे न्यायालयात पाठविली असल्याचे त्यांनी तोंडी सांगितले. कागदपत्रांचा शोध घेण्यात येत आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे श्री.जगदीश निंबाळकर यांनी केले.

सन २००२ मधील आदेशाशी संबंधित कागदपत्रे असून जतनाचा कालावधी तीस वर्षांचा आहे, अशी कागदपत्रे उपलब्ध न होणे हा कायद्याचा भंग आहे. दि.२८.२.२०१० पर्यंत संबंधित

कागदपत्रांचा शोध घेऊन त्यांच्या प्रती, तत्कालीन आवक-जावक बारनिशीच्या प्रती अपीलकर्त्यास द्याव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु या मुदतीत आपल्याला कागदपत्रे मिळाली नाहीत, अशी तक्रार श्री.शेलार यांनी दि.३.३.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. संबंधित कागदपत्रांचा शोध सुरु असून अहवाल सादर करण्यास दि.१०.३.२०१० पर्यंत मुदतवाढ मिळावी, अशी विनंती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे श्री.जगदीश निंबाळकर यांनी दि.५.३.२०१० च्या पत्रान्वये केली. असा अहवाल त्यांनी अद्याप सादर केलेला नाही. निवासी नायब तहसीलदार व तहसीलदार, हवेली यांनी दस्तऐवज दिलेला नाही व दस्तऐवज उपलब्ध नसल्याचे सांगण्यास न्यायालयात साक्षीदारही उपस्थित केले नाहीत, अशी तक्रार श्री.शेलार यांनी दि.१७.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली.

वरील बाब लक्षात घेता जतनाच्या कालावधीनुसार कागदपत्रे जतन करण्यात आली नसून अपीलकर्त्यास नाकारली जात आहेत. त्याबाबत संबंधितांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदवून पुढील कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे श्री.जगदीश निंबाळकर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली तहसील कार्यालय, शुक्रवार पेठ, पुणे श्री.विजय पाटील यांनी कागदपत्रांचा नेमका शोध घेण्याबाबत केलेली कार्यवाही, संबंधितांना दिलेल्या नोटिसा, संबंधित कागदपत्रांअभावी होणाऱ्या अपीलकर्त्यांच्या गैरसोयीबाबतचा पर्याय आदी तपशिलासह अहवाल त्वरित सादर न केल्यास ते कारवाईस पात्र ठरतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आनंदराव बबनराव गावडे
मु.पापळवाडी, पो.चासकमान, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा नियोजन अधिकारी,
जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी,
जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७१ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा नियोजन अधिकारी,
जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.उत्तम चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी,
जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.विजय भोपळे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.७.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.८.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२६.८.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.८.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडून माहिती मिळाली नाही व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी अपिलाची दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.आनंदराव बबनराव गावडे यांनी केली.

अपीलकर्त्याची तक्रार चुकीची आहे. विहित मुदतीत त्यांना शुल्क कळविले. शुल्क न भरता त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी कळविल्याप्रमाणे शुल्क भरून माहिती घ्यावी, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.विजय भोपळे व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.उत्तम चव्हाण यांनी पूरक कागदपत्रांसह केले. अशा प्रकारचा कोणताही पत्रव्यवहार झाला नसल्याचे प्रतिपादन श्री.गावडे यांनी केले. त्यामुळे श्री.गावडे यांना पाठविलेल्या पत्राबाबतची जावक बारनिशीतील नोंदीची छायांकित प्रत सादर करण्याचे आदेश आयोगाने दिले. त्यानुसार संबंधित छायांकित प्रत

अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.उत्तम चव्हाण यांनी त्याच दिवशी दि.२७.४.२०१० रोजी आयोगाला सादर केली. ती पाहता अपीलकर्त्याचे निवेदन रास्त नाही, असे स्पष्ट होते. अपीलकर्त्यास माहिती आवश्यक असल्यास शुल्क भरून प्राप्त करून घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

पुणे
30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुभाष निवृत्तीराव पवार
मु.पो. उत्तमनगर, देविवनच्या मागे, किवळे,
ता. हवेली, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ,
१९/२१, मनोहरदास रस्ता, मुंबई — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ,
१९/२१, मनोहरदास रस्ता, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.३.२०१० |

**३. उपस्थित**

अपीलकर्ता - श्री. सुभाष निवृत्तीराव पवार
मु.पो. उत्तमनगर, देविवनच्या मागे, किवळे,
ता. हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.५.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.१०.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.७.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१०.२००६ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाकडे सेवाशर्ती आदींबाबतची आपण मागितलेली माहिती अपूर्ण व चुकीची दिली. मंत्रालयाने दिलेल्या सेवाशर्तीपेक्षा वेगळे उत्तर महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाने दिले. माहिती तर्कसंगत नाही व सत्य नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. सुभाष निवृत्तीराव पवार यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता कायम नेमणूक न दिल्याच्या अनुषंगाने श्री. पवार अनेक अर्ज व पत्रव्यवहार करीत आले आहेत, त्या अनुषंगाने अनेक बाबींची खुलासेवजा विचारणा अपीलकर्त्यांनी अर्जातील वीस मुद्दयांमध्ये केली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांनी दि. २४.२.२००९ च्या पत्रान्वये उत्तराच्या प्रतीसह आयोगास कळविले आहे. जन माहिती अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांनी अपीलकर्त्यास मुद्देनिहाय माहिती दिली आहे. त्यांच्या अर्जातील अनेक मुद्दे (उदा. ६,८,९, १२,१४,१७,१९ व २० ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत येत नाहीत. मात्र सेवाशर्ती-बाबतची नियमावली मंडळाने अपीलकर्त्यास त्वरित पुरवणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 27 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कॉन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बबन आप्पाजी बांगर
रा.बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, ओतूर, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बबन आप्पाजी बांगर
रा.बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.डी.व्ही.पडुळकर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, ओतूर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.जी.एस.पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.१०.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.१०.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१४.११.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | निर्णय नाही |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ व दि.२४.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. दोन्ही वेळा जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर राहिल्याने अपिलाची सुनावणी दि.२४.२.२०१० रोजी घेण्यात आली.

वीज चोरीबाबत आपण केलेल्या तक्रारीवर संबंधितांची नावे देऊनही वीज मंडळाने कारवाई केली नाही. वीज चोरीची मोटार आजही त्याच जागी आहे. त्यावर कारवाई करण्याऐवजी आपल्याला मारहाण करून आपल्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला व कारवाई संदर्भातील माहिती चुकीची दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.बबन आप्पाजी बांगर यांनी केली.

श्री.बांगर यांनी अर्ज केला तेव्हा नारायणगाव उपविभाग होता. नारायणगाव उपविभागाकडून माहिती मिळवून दिली. वीज चोरी आढळली नसल्याचा अहवाल शाखा अभियंता यांनी दिला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, ओतूर, ता.जुन्नर, जि.पुणे यांचे प्रतिनिधी श्री.जी.एस.पाटील यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.डी.व्ही.पडुळकर यांनी त्याला दुजोरा दिला.

अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे यांनी प्रत्यक्ष जागेवर पाहणी करून वस्तुस्थितीची माहिती द्यावी. वस्तुस्थितीनुसार दिलेली माहिती खोटी असल्यास संबंधितांवर कारवाई करावी, असे मौखिक

आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अशा पाहणीसाठी सहाय्यक अभियंता, नारायणगाव यांच्याशी संपर्क साधण्यास कळविल्याचे सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, ओतूर, ता.जुन्नर, जि.पुणे यांनी दि.२५.२.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. तथापि आयोगाच्या आदेशानुसार ही कार्यवाही नाही. अपिलीय प्राधिकारी श्री.डी.व्ही.पडुळकर यांनी स्वतः पाहणी करून अहवाल आयोगाला सादर करावयाचा आहे, याची जाणीव त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे यांनी स्वतः पाहणी करून आयोगाला अहवाल सादर करणे आवश्यक होते. त्यांनी त्यानुसार कार्यवाही केलेली नाही. याबाबतचा खुलासा व मूळ आदेशानुसार अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.डी.व्ही.पडुळकर यांनी दि.५.५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा, अन्यथा ते कारवाईस पात्र ठरतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.१९.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास दत्तात्रय बारवकर
चाकण विद्याधाम कॉलनी, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण, पाषाण, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
खेड विभाग, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विलास दत्तात्रय बारवकर
चाकण विद्याधाम कॉलनी, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण, पाषाण, पुणे श्री.रामनाथ पोकळे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
खेड विभाग, ता.खेड, जि.पुणे श्री.अशोक शेजाळ

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.८.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.९.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.८.१०.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.१०.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

माहिती अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विलास दत्तात्रय बारवकर यांनी केली.

श्री.बारवकर यांनी अनेक पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची व्यक्तिगत स्वरूपाची, त्यांना असलेली व्यसने आदींबाबतची माहिती मागितली होती. तसेच स्वत:वर केलेल्या आरोपांचे पुरावे प्राप्त करून देण्याची मागणी केली होती. अशा प्रकारची माहिती देता येत नसल्याचे विहित मुदतीत योग्य त्या स्पष्टीकरणासह त्यांना कळविले. त्यांच्याविरूध्दच्या आरोपांबाबतची कागदपत्रे न्यायालयात आरोपपत्रासोबत दाखल करण्यात आली असून त्याची प्रत ते न्यायालयाकडून प्राप्त करून घेऊ शकतात, असेही त्यांना कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड विभाग,ता.खेड, जि.पुणे श्री.अशोक शेजाळ व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण, पुणे श्री.रामनाथ पोकळे यांनी केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्याने मु.क्र.१ ते ३ मध्ये केलेल्या बहुसंख्य बाबी

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम २ मधील तरतुदीनुसार 'माहिती'च्या व्याख्येत समाविष्ट होत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२६.४.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री अर्जुन मारूती पाटील ..... **अपीलकर्ता**
मु.पो.भामटे, ता. करवीर जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, ..... **उत्तरवादी**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** धर्मादाय सह आयुक्त कार्यालय,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३/**२००९/**कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक १०.२.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री अर्जुन मारूती पाटील
मु.पो.भामटे, ता. करवीर जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** धर्मादाय सह आयुक्त कार्यालय,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** धर्मादाय सह आयुक्त कार्यालय,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक ९.२.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक २.४.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मूळ माहिती अर्ज (जोडपत्र 'अ') ची प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शिक्षण संस्थेबाबतची कागदपत्रे मागणाऱ्या आपल्या अर्जावर जन माहिती अधिकारी तथा धर्मादाय सहआयुक्त कार्यालय, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर यांनी दिली नाही. तसेच त्यावेळी संबंधित कागदपत्रे उपलब्ध असताना त्यांच्या प्रती दिल्या नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अर्जुन मारूती पाटील यांनी केली.

आपण दि.२१.५.२००९ रोजी शासकीय सेवेतून निवृत्त झालो असून आपण सेवेत असताना कर्मचारीवर्ग अपुरा होता व आपल्याकडे अतिरिक्त कार्यभार होता. अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत पत्र तयार करून जावक विभागाकडे दिले होते. परंतु ते पाठविले गेले नसल्याचे आता चौकशी केल्यानंतर समजले. माहिती न देण्याचा अथवा टाळण्याचा आपला कोणताही उद्देश नव्हता. तयार करून दिलेले पत्र पाठविले न गेल्यामुळे गैरसमज झाला आहे, असे निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा धर्मादाय सहआयुक्त कार्यालय, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर श्री.वि.ह.चोकाककर यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह केले. आदर्श शिक्षण संस्था, भामटे(एफ-११३६३) ता.करवीर, जि.कोल्हापूर या संस्थेची सर्व कागदपत्रे सील केलेली असल्याचे व त्यामुळे प्रती देता येत नसल्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा धर्मादाय सहआयुक्त कार्यालय, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर श्री.अ.म.सडोलीकर यांनी सांगितले.

आपण अर्ज केला तेव्हा कागदपत्रे सील केलेली नव्हती, असे अपीलकर्ता श्री.अर्जुन मारूती पाटील यांनी नमूद केले.

अतिरिक्त कार्यभार, माहिती अर्जावर तयार केलेले उत्तर या बाबी लक्षात घेऊन व आपण निवृत्त झालो असल्यामुळे विलंबाबद्दल क्षमा करून शास्ती लावू नये, अशी लेखी व तोंडी विनंती श्री.चोकाककर यांनी केली. ती मान्य करण्यात येत आहे. मात्र तयार केलेले पत्र अपीलकर्त्यास पाठविले न जाणे ही बाब योग्य नसून यापुढे अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही, याची खबरदारी घेण्याची समज विद्यमान जन माहिती

अधिकारी तथा धर्मादाय सहआयुक्त कार्यालय, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर श्री.अ.म.सडोलीकर यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.४.२०१०